माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२६५४**

**अपिलार्थी श्रीमती मीना सुशिल साळुंखे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक अधिकारी (मुंबई-४)**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-४
कल्पतरु पॉईंट, दुसरा मजला, शिव माटुंगा स्किम रोड क्र.०८,
शिव सर्कल समोर, शिव (पूर्व), मुंबई - ४०००२२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-४
कल्पतरु पॉईंट, दुसरा मजला, शिव माटुंगा स्किम रोड क्र.०८,
सिने प्लॅनेट सिनेमा समोर, शिव सर्कल समोर, शिव (पूर्व), मुंबई - ४०००२२

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.१२.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०५.२०२४ | ११.०६.२०२४/१८.०७.२०२४ | २४.०६.२०२४ | ०९.०७.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०८.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये अर्धवट, दिशाभुल करणारी माहिती दिली असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १८.०७.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०९.०७.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २२.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *“सन २०१९ ते सन २०२४ अर्जाच्या दिनांका पर्यंतच्या कालखंडानुसार मुद्दा क्र. (१) दिपक आणि साहिल आर. एम. सी. प्रकल्प चालकाने भुखंड मालकाची परवानगी प्राप्त करुन महानगरपालिकेच्या संबंधित खात्यांची (विभागांची) परवानगी प्राप्त करुन मंडळाने संमतीपत्र दिले असल्यास त्याची माहिती द्यावी. मुद्दा क्र. (२) आर. एम. सी. प्लांटला परवानगी संमतीपत्र देण्याआधी स्थळ पाहणी केल्याचा visit report ची माहिती व अहवाल मिळावा. मुद्दा क्र. (३) या आर. एम. सी. प्लांट उद्योगाच्या निगडीत कागदपत्रांची फाईल्स अर्जदारास निरीक्षणास बोलावून आवश्यक असलेली कागदपत्रे मिळावी. मुद्दा क्र. (४) नागरीकांनी दाखल केलेल्या तक्रारी अर्जावर आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. तसेच नागरीकांनी दाखल केलेल्या अर्जाच्या प्रती मिळाव्यात. मुद्दा क्र. (५) Captive Consent RMC Plant उद्योगाला दिल्यानंतर Commercial वापर करत असल्यास आपल्या विभागामार्फत कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात येते याची माहिती द्यावी.”*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नाही म्हणून अपिलार्थीनी दि. २४.०६.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०७.२०२४ रोजी असे आदेशित केले की, अर्जदाराने अर्जामध्ये मागणी केलेली माहिती उप प्रादेशिक मुंबई ३ यांनी जन माहिती अधिकारी यांना दि.१०.०६.२०२४ रोजी पाठविण्यात आल्याचे दिसुन येते. माहिती अधिकारी यांना आदेश देण्यात येत आहे की, अर्जदाराने अर्जामध्ये मागणी केलेली माहिती व संबंधित दस्त आदेश पारित झालेल्या दिवसांपासुन १५ दिवसांच्या आत अर्जदारास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती अर्जदारास नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावी. सबब, अर्जदाराने दाखल केलेला अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींना दि. ११.०६.२०२४ रोजी शासकीय शुल्क भरण्यास कळविले होते. परंतु टपालामार्फत सदर पत्र कार्यालयास परत आलेले आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर दि. १८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०६.२०२४ व दि. १८.०७.२०२४ रोजीच्या पत्राची प्रत आयोगासमोर सादर केली.

५. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

11-12-2025

**मुंबई**
**दिनांक : ११.१२.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**